**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# एमपीएसीचा अभ्यास करणारा अभ्यासू बनतो : मंदा शेजवळ

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

एमपीएससी परिक्षांची खडतर तयारी करताना जो माणूस घडतो तो अभ्यासु, जबाबदार, समंजस नागरीक बनतो, असे प्रतिपादन मंदा शेजवळ यांनी केले.

पाटण येथे एमपीएससी परीक्षेत यश मिळविले त्याबद्दल कॉलेजच्या वतीने आयोजित सत्कारप्र संगी त्या बोलत होत्या. यावेळी कोयना एज्यूकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य शिरीषकुमार पवार, प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे, मंदा शेजवळ व पालक, शिक्षक उपस्थित होते. मंदा शेजवळ म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी परिसरातील इतिहास, भूगोल याचाही अभ्यास करावा. दर्जेदार वर्तमानपत्रे वाचावित. त्याचे आकलन करावे. ध्येयाला धरून राहिले पाहिजे. जिद्द ठेवले तर यश नक्की मिळते. प्रास्ताविक प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. हेमलता काटे यांनी केले.



पाटण : कार्यक्रमात बोलताना मंदा शेजवळ, व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, संजीव चव्हाण, प्राचार्य शिरीषकुमार, प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे.